विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा - ऑक्टोबर २०२४

इयत्ता : बारावी    विषय : मराठी (व्दितीय भाषा)    वेळ : ३ तास

दिनांक : २२।१०।२०२४    गुण : ८०

---

सूचना : (i) शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :

1. मानव 1
2. सुरेख 1
3. चपळ 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा :

4. शास्त्र 1
5. मध 1
6. चमत्कार 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा :

7. आशा 1
8. रसिक 1
9. उदास 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :

10. कारभारीण 1

11. मांजर 1

12. गुरुजी 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :

13. इमारती 1

14. डबकं 1

15. भाकरी 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

16. जागा झाल्या<u>वर</u> चारी पाय ताणून <u>मी</u> जांभई दिली <u>आणि</u> डोळे <u>उघडले</u>. 4

## विभाग 2 - गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

17. माशेलकरांच्या आईला माशेलकर लहानपणी कोणते खेळ खेळलेले आवडायचे नाही ? 1

18. काझिरंगा अभयारण्यात प्रथम दिसलेला गेंडा लेखकाला कोणासारखा दिसला ? 1

19. नव्या मैत्रिणीवर रुबाब मारण्यासाठी मांजर झालेल्या लेखकाने काय केले ? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

20. स्वाती नक्षत्राचा पाऊस समुद्रात पडल्यावर ________ 1

अ. भात पिकलं जातं.

आ. मोती पिकले जातात.

इ. जोंधळा पिकला जातो .

21. डॉ. माशेलकरांच्या प्रकाशवाटेला सतत प्रेरणा देणारे विज्ञानशिक्षक म्हणजे__________ 1

अ. प्रा. भावे

आ. प्रा. एम.एम शर्मा

इ. प्रा. बी. टिळक

22. मंगेश देव असूनही कधी आवडला नाही एवढे चित्रातले ते गांधीजी तेव्हा कर्णिकांना आवडत असत कारण ____________________ 1

अ. त्यांचे ते गोल केशहीन मस्तक

आ. त्यांची ती झपाझप चालणारी चाल

इ. त्यांचे ते लहान मुलांसारखे निर्मळ, स्वच्छ हास्य

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

23. ' भावाला जेवायला वाढल्यावाचून ओवाळणी मिळत नाही ' 5

किंवा

"आणि मी काय कुणाच्या बापाच्या पलंगावर बसलो नव्हतो ... माझ्या मालकीच्या पलंगावर बसलो होतो ."

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

24. काझिरंगा अभयारण्यात प्रथमच दिसलेल्या गेंड्याचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ? 5

किंवा

महात्माजीच्या हत्येची बातमी ऐकल्यावर कर्णिकांना आईची आठवण का आली ?

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

25. संत नामदेवानी आपल्या अभंगात 'चक्रवाक पक्षाची' प्रतिमा का वापरली आहे ? 1

26. सागराने भूमातेला कोणाचा धाक दाखवला ? 1

27. कवी बा. भ. बोरकरांनी कोणत्या हातांना देखणे हात म्हटले आहे ? 1

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

28. ______ अग्नी नेणती ज्या रूपा । स्वप्रकाशरूपा नेणे वेद ॥ 1

29. देखणी ती ______ जी ध्यासपंथे चालती ॥ 1

30. तुमची पोरगी डोक्यानं लई ______ हाई 1

( पाऊले , बेस , मुक्ताफळे , रविशशि )

खालील पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

31. सद्‌गुरूराया माझा आनंदसागर । त्रैलोक्या आधार गुरुराव ॥ 5

किंवा

त्यो आसरू मज्यासाटी हाय सोन्याचा गोळा

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

32. संत नामदेवांनी आपल्या मनाची अवस्था कोणकोणत्या उदाहरणांतून स्पष्ट झाली आहे? 5

किंवा

'सागरा प्राण तळमळला' या कवितेत कवीचे मातृभूमीच्या वियोगाचे दुःख कसे प्रकट झाले आहे ?

## विभाग 4 – लेखन

खाली दिलेल्या वाक्‌प्रचारांना त्याखाली दिलेल्या अर्थाचा योग्य पर्याय निवडून लिहा :

33. भांबावून जाणे ______________ 1

- मोठयाने ओरडणे
- निघून जाणे
- गोंधळून जाणे
- वश करून घेणे

34. जायबंदी होणे __________ 1

- हल्ला करणे
- गोळी घालणे
- त्रास होणे
- जखमी होणे

35. नाकाने कांदे सोलणे__________ 1

- शिष्टपणा दाखवणे
- कार्य साधणे
- प्रभाव टाकणे
- काळजी नसणे

36. हलकल्लोळ माजणे__________ 1

- वाद घालणे
- आरडाओरड करणे
- उतावीळ होणे
- निघून जाणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आळस सोडायचा म्हणजे परिश्रम करावयाचे. आळस जिकण्याचा हाच एक उपाय आहे.हा उपाय अमलात आणला नाही तर त्याची शिक्षा ही निसर्ग भोगावयास लावील.रोगाच्या किंवा अन्य कोणत्या तरी रूपाने शिक्षा भोगणे सुटत नाही.शरीर ज्याअर्थी आम्हांला दिलेले आहे.त्याअर्थी श्रम हे करावे लागणारच. शरीर श्रमामध्ये गेलेला वेळ फुकट जात नाही, त्याचा मोबदला मिळतो. आरोग्य उत्तम लाभते. बुध्दी सतेज ,तीव्र व शुध्द होते. पुष्कळ विचारवंताच्या विचारातही त्यांच्या पोटदुखीचे व डोकेदुखीचे प्रतिबिंब उमटते.विचारवंत जर उन्हात, मोकळया हवेत, सृष्टीच्या सान्निध्यात मेहनत करील तर त्याचे विचारही तेजस्वी होतील. शारीरिक रोगाचा जसा मनावर परिणाम होतो,त्याप्रमाणे शारीरिक आरोग्याचाही मनावर परिणाम होतो ही अनुभवाची गोष्ट आहे.पुढे क्षयरोग जडल्यावर पाचगणीला टेकडीवर हवा खावयास जायचे किंवा सूर्यकिरणांचे प्रयोग करावयाचे त्याच्या आधीच बाहेर पडून बागेला पाणी घातले, लाकडे फोडली तर काय होईल ?

\- प्रा. श्रीकांत नाईक

प्रश्न :

37. आळस सोडायचा म्हणजे काय करायचे ? 1

38. श्रम केल्यामुळे आपल्या शरीरमनाला कोणते फायदे होतात ? 2

39. विचारवंताचे विचार तेजस्वी कसे होतील ? 2

40. 'युग उच्च माध्यमिकविद्यालय ' सांगे येथे संपन्न झालेल्या 'स्वच्छता अभियान दिन' कार्यक्रमाचा वृत्तांत 10 ते 12 ओळीत लिहा. 5

41. 'तरुणाईवर व्हिडिओ गेम्सचा प्रभाव ' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळींत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळीचा निबंध लिहा. 10

मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

**किंवा**

माझा आवडता संतकवी

**किंवा**

शेतकऱ्याचे आत्मवृत्त

**किंवा**

यंदाचा प्रलयंकारी पाऊस

**किंवा**

मी सैनिक झालो तर..........

||||||||||||||||||||||||||||||